१.२.८ खोड किडीच्या नियंत्रणासाठी हेक्टरी ५ कामगंध सापळे (इ.एस.बी. ल्युर)शेतात लावावे.आवश्यकता भासल्यास क्लोरॅनट्रॅनिलीप्रोल ०.४% दाणेदार हे किटकनाशक १८.७५ किलो किंवा फिप्रोनिल ०.३% दाणेदार हे किटकनाशक २५ ते ३० किलो प्रति हेक्टरी या प्रमाणात वापरावे.

१.२.९ भविष्यात पाण्याचा ताण पडण्याची शक्यता असल्यास म्युरेट ऑफ पोटॅशची मात्रा शिफारशीत मात्रेपेक्षा २५% नी वाढवून दयावी.

१.२.१ लवकर लागण केलेल्या सुरू ऊसाला लावणीनंतर ६ ते ८ आठवड्यांनी हेक्टरी १०० किलो नत्राचा (२२० किलो युरिया) दुसरा हप्ता द्यावा.

**१.३ खोडवा :**

१.३.१ १५ फेब्रुवारी नंतर तुटलेल्या ऊसाचा खोडवा ठेवू नका.

१.३.२ खोडवा पिकाची मशागत पूर्ण होताच पाणी देऊन वापसा येताच पहारीच्या सहाय्याने वरंब्याच्या एका बगलेस १५ ते २० से.मी. अंतरावर १ फूटावरती छिद्रे घेऊन हेक्टरी १२५ किलो नत्र(निमकोटेड युरिया २७१ किलो), ५८ किलो स्फुरद (सिंगल सुपर फॉस्फेट ३६३ किलो) व ५८ किलो पालाश (म्युरेट ऑफ पोटॅश ९७ किलो) द्यावा. छिद्रे घेण्यासाठी पाडेगाव पध्दतीच्या पहारीचा वापर करावा.

**१.४ ऊस पिक संरक्षण :**

१.४.१ ऊस पिकावर खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास हेक्टरी ३-४ फुले ट्रायकोकार्ड वापरावीत. पुढील प्रसारण १० दिवसाच्या अंतराने करावे किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १५ मिली किंवा मेलॅथिऑन ५० टक्के प्रवाही २० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

१.४.२ खोडवा ऊसावर केवडा पडल्यास (क्लोरोसीस) हेक्टरी २५ किलो हिराकस १०० किलो चांगल्या कुजलेल्या शेणखतात आठवडाभर मुरवून कोली पध्दतीने दयावे.

१.४.३ ऊस पिकावरील लोकरी माव्याच्या नियंत्रणासाठी:

१.४.३.१ लोकरी माव्याच्या नियंत्रणासाठी कोनोबाथ्रा, डिफा अशा मित्र किटकांचे संवर्धन करावे.

१.४.३.२ लोकरी मावा किडीच्या जैविक नियंत्रणासाठी मेटॅन्हायझियम ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

१.४.३.३ प्रादुर्भावग्रस्त शेतात मित्रकिडीचा वावर असल्यास त्याचे जतन व्हावे यासाठी १० टक्के फोरेट (थिमेट) हे दाणेदार औषध सहा महिन्यांपेक्षा लहान पिकात हेक्टरी ६ ते ८ किलो या प्रमाणात जमिनीत मुळांच्या सानिध्यात मिसळावे व पिकास हलके पाणी द्यावे.

१.४.३.४ प्रादुर्भाव जास्त प्रमाणात असल्यास मिथिल डिमेटॉन २५ टक्के प्रवाही किंवा डायमिथोएट ३० टक्के प्रवाही १५ मि.ली.+१० मि.ली. स्टिकर प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पिकावर फवारावे.

१.४.४ काणीग्रस्त व गवताळ वाढ रोगांची ठोंबे दिसताच ती उपटून नष्ट करावीत.

**२) <u>रब्बी ज्वारी</u> :**

२.१ वेळेवर पेरणी झालेल्या पिकाची वेळीच काढणी करून कणसे उन्हात चांगली वाळवून मळणी करावी. साठवणुकीपुर्वी ज्वारीचे धान्य उन्हात वाळवावे व साठवणूक करावी.

२.२ उशीरा पेरलेल्या पिकास जमिनीत अपुरी ओल असल्यास दाणे भरण्याच्या अवस्थेत १०-१५ दिवसांनी पाणी द्यावे.

**३) <u>गहू</u> :**

३.१ उशीरा पेरलेल्या पिकास दाणे भरण्याच्या अवस्थेत ८० ते ८५ दिवसांनी पाणी द्यावे.